**प्रेस नोट** **दिनांक:- १५/०९/२०१७**

आरोपी नामे १. राजु उर्फ काल्या महादेव पात्रे, वय-३२ वर्षे, रा. साई इन्कलेव्ह, रुम नं.२०,४ था मजला जांभुळवाडी रोड, दत्तनगर, आंबेगाव,पुणे ,२. संतोष मच्छिंद्र जगताप, रा. मोरवाडी, तुपेनगर, पिंपरी चिंचवड,पुणे ३. लुभ्या उर्फ संतोष चिंतामण चांदिलकर, रा.लवळे ता.मुळशी जि. पुणे हे जबरी चोरी, खुन,खुनाचा प्रयत्न अशा निरनिराळया गुन्हयांमध्ये येरवडा मध्यवर्ती कारागृह,येरवडा,पुणे येथे आहेत. त्यांना दिनांक १०/०४/२०१७ रोजी येरवडा जेलमधून काढून पोलीस सरकारी वाहनाने मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,खंडाळा जि. सातारा येथील न्यायालयात १४.३० वाजता हजर करुन परत येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे जमा करीता जुना कात्रज घाटमार्गे जात असताना चेक पोस्ट जवळील एक वळणावर तिन्ही आरोपींनी लघवी लागल्याने गाडी थांबवून त्यांना पोलीस बंदोबस्तात लघवीकरीता खाली उतरवरुन तिन्ही आरोपी लघवी करीत असताना संगनमत करुन पोलीस पार्टीस धक्का देवून अंधाराचा फायदा घेवून पोलीस पार्टीचे कायदेशीर रखवालीतून कात्रज घाटातील जंगलात पळून गेले म्हणून पिंपरी पो.स्टे. गुरनं.३५२/२०१७ भादंविक २२४,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरील गुन्हयातील आरोपींचा शोध व तपास गुन्हे शाखेकडील युनिट-४ पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र तोडकर व त्यांचे युनिटकडील कर्मचा-यांनी केला आहे. त्याना नमुद गुन्हयातील आरोपी राजु उर्फ काल्या महादेव पात्रे हा विदयानगर, चिंचवड येथील राहते घरी त्यांचे भेटण्यास आल्याची खात्रीशीर बातमी मिळालेने त्यांनी सापळा लावून दिनांक १५/०९/२०१७ रोजी पकडले व त्यांना १६.०० वा. नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीकडे केलेल्या तपासामध्ये त्याने आरोपींना पळून जाणेकरीता इसम नामे सुरेश झेंडे रा. थेरगांव,पुणे याने मदत केली असल्याचे सांगितलेने त्याचा शोध घेवून पकडले असता त्याने त्याचे नाव सुरेश स्वामिनाथ झेंडे वय-२९ वर्षे, रा. दत्तराज कॉलनी, पवारनगर, स.नं.१२/१२, थेरगांव,पुणे असे सांगितले. नमुद आरोपीचा गुन्हयात सहभाग असलेचे निष्पन्न झालेने त्यांस १८.०० वाजता अटक केली. नमुद दोन्ही आरोपींकडे अधिक तपास करता त्यांनी ॲड. सुशिल मंचरकर व माजी नगरसेवक कामगार नेता कैलास कदम यांच्यात सन-२०१५ मध्ये मनपाचे सभेत झालेल्या भांडणावरुन व राजकीय वैमनस्यामुळे कैलास कदम याचा खुन करण्याचा कट रचला व त्यासाठी ३० लाख रुपये, शस्त्र व इतर साधन सामुग्री पुरविण्याचे नियोजन केले. सदर कटाची अंमलबजावणी करण्यासाठी आरोपींना तुरुंगाबाहेर काढणे आवश्यक असल्याने व आरोपींना विविध गुन्हयातून जामीनावर सोडविणे हे दिर्घकाळ चालणारे व खर्चीक काम असल्याने कोर्टपेशीचा बहाणा करुन आरोपींना पळवून लावणे याबाबतची आरोपी सुरेश झेंडे याचेकडे दिली. त्यानुसार झेंडे याने खंडाळा न्यायालय येथे सेंटीग करुन लुब्या चांदीलकर, काल्या पात्रे,संतोष जगताप यांची पारगाव खंडाळा कोर्टाची केस सुरु करुन घेतली. त्यानुसार वर नमुद तारखेस मोरवाडी, पिंपरी येथे गेल्यावर तेथून पळून जाण्याचा प्लान केला. जेणेकरुन पोलीसांना तक्रार करण्यास वेळ लागेल व आरोपींना पुण्याच्या बाहेर जाण्यास वेळ मिळेल. बाहेर आल्यावर कैलास कदम याचा खुन करुन कट तडीस जाईल या करीता आरोपींनी कट करुन पोलीसांचे रखवालीतून पळून गेलेचे निष्पन्न झाले आहे. **पोलीसांची रखवालीतून पलायन करुन कैलास कदम यांचा खुन करण्याचा कट करण्याकरीता ॲड. मंचरकर याने जेलमध्ये, शिवजीनगर कोर्टामध्ये, आरोपी तारखेवरुन येत असताना खेड शिवापूर येथे आरोपींशी संगणमत केले.** म्हणुन ॲड. सुशिल हरीशचंद्र मंचरकर वय-५० वर्षे, रा.फलॅट नंबर १००२, बिल्डींग बी, माणिक बाग, उदयमनगर, आण्णसाहेब मगर स्टेडीयमसमोर,नेहरुनगर, पिंपरी,पुणे यांस ताब्यात घेवून तपास करता त्याने पिंपरी पो.स्टे. गुरनं.६४७/२०१५ भादंविक ३०७,३९५,१४७ या गुन्हयामध्ये १४ डिसेंबर-२०१५ पर्यत जेलमध्ये असताना वर नमुद आरोपींशी ओळख झालेचे तसेच संतोष जगताप यास पुर्वी पासून ओळखत असल्याचे सांगितले. त्यास नमुद गुन्हयात दिनांक १५/०९/२०१७ रोजी १२.०० वा. अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास दिनांक १९/०९/२०१७ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. सध्या वर नमुद सर्व आरोपी पोलीस कस्टडी रिमांडमध्ये आहेत.

वरील प्रमाणे ॲड. सुशिल मंचरकर याचा माजी नगरसेवक कामगार नेता कैलास कदम यांचा खुन करण्यासाठी वर नमुद आरोपीना पोलीसांचे रखवालीतून पळवून लावण्याचा कट गुन्हे शाखेकडील युनिट-४ चे पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र तोडकर व त्यांचे युनिटकडील अधिकारी व कर्मचारी यांनी अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री. प्रदीप देशपांडे व पोलीस उपआयुक्त,गुन्हे श्री. पंकज डहाणे यांचे मार्गदर्शनाखाली वेळीच उघडकीस आणलेला आहे.

**ॲडव्होकेट सुशिल हरीशचंद्र मंचरकर यांना वर नमुद आरोपींना पळवून जाणेकरीता कट करुन मदत केले बाबत अटक करण्यात आली असून यापुर्वी ॲडव्होकेट वर्षा फडके यांना कोंढवा पो.स्टे. गुरनं. ४७७/२०१५ भादंविक ३०७,३८७,४४७,५०४,५०६(२),४६८,४७१,३४, मोका कलम ३(१) (ii),३(२),३(३),३(४),३(५),४ या गुन्हयातील मुख्य आरोपी बापु नायर यास गुन्हयात मदत केले बद्दल अटक करण्यात आली असून सध्या त्या येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे येथे आहेत.**

---ooo---